ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 7| April - 2016

Review Of Research

# “जागतिकीकरण व सहकारी चळवळीसमोरील आव्हाने”

**पाटील व्ही. एच.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख , सी.टी.बोरा महाविद्यालय, शिरुर(घोडनदी) शिरुर , पुणे.

## प्रस्तावना :-

सहकार या चार अक्षरी शब्दाने मानवी जीवनातील सर्व व्यवहार मानवाने जोपासलेला सामाजिक, आर्थिक दर्जा, जीवनाच्या अनुषंगाने येत असलेल्या ज्ञान विज्ञानाची आणि त्यातही जीवन विकासाचा पाया ज्या संस्कृतीवर अवलंबून आहे. ते सारेच सारे सहकार या शब्दाच्या भोवती फिरताना दिसते. सहकार हे समस्या सोडविण्याचे एक प्रभावी साधन आहे. सहकारात अनेक व्यक्ति स्वच्छेने एकत्र येऊन परस्पर सहकार्यातून कार्य पुर्णत्वास नेतात.



मानवाने स्वत:चा विकास करत असताना २१ व्या शतकाच्या वाटचालीत यंत्रयुग व विज्ञान संस्कृती यांनी औदयोगिक क्रांती आणली त्यामुळे समस्त मानव जातीचे भौतिक जीवन सुखद होऊन मानवाला भौतिक सुखापेक्षा आत्मिक सुखाची ओढ लागली त्यामुळे वर्तमानकाळचा महिमा म्हणजे सहकारास प्रारंभ होय. मनुष्यांच्या प्राथमिक अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी उत्पन्नाचे साधन महत्वाचे आहे. त्यावेळी सहकारी चळवळीच्या माध्यमातून आपआपल्या कार्यक्षेत्रामध्ये अनेक प्रकारचे व्यवसाय व उदयोग उभारुन सर्वांगीण विकासासाठी महत्वपूर्ण कार्य झाले आहे. सहकारी वृत्तीने अनेक सहकारी संस्था स्थापन झाल्या त्या परस्परांच्या विकासाकरीता सहकारामुळे समाजातील प्रत्येक माणसाची आर्थिक उन्नती होते. ग्रामीण भागाचा विकास सहकाराच्या माध्यमातून होतो त्यामुळे सहकारी चळवळीला महत्वाचे स्थान आहे.

## सहकार एक संकल्पना :-

सहकार ही विश्वव्यापी चळवळ असून प्रामुख्याने ती जनतेची चळवळ आहे. प्राचिन काळापासून सहकाराला सुरुवात होऊन मानवाच्या कल्याणार्थ सहकारी चळवळीचा व सहकाराचा वापर करणे शक्य झाले आहे.

सहकार या शब्दाचा अर्थ असा होतो की *“अनेकांनी एकत्र येऊन परस्परांच्या साहाय्याने केलेले कार्य होय”*.

‘*सह*’ म्हणजे *बरोबर* आणि ‘*कार्य*’ म्हणजे ‘*काम*’ यालाच दुस-याबरोबर स्वखुशीने केलेल्या कामाला सहकार Co-Operation असे म्हणतात. थोडक्यात सहकार म्हणजे मिळून मिसळून केलेले कार्य होय.

## सहकाराचा उगम: —

इंग्लंडमधील औदयोगिक क्रांतीच्या उत्तरार्धात १८ व्या शतकात पाश्चिमात्य देशात सहकार चळवळीचा उगम झाला. रॉशडेल पायोनिअर्सने १८४४ मध्ये जर्मनी व भारतात सहकारी चळवळीचा पाया घातला गेला. १८४४ मध्ये भांडवलदार व उद्योगपती वर्गाकडून कामगार वर्गाचे शोषण रोखण्यासाठी कामगारांना एकत्र करुन रॉशडेल पायोनिअर्स यांनी पहिली सहकारी ग्राहक संस्था स्थापन केली. त्यानंतर जर्मनी, डेन्मार्क, नार्वे, स्वीडन, इटली येथे सहकारी संस्थाची उभारणी झाली, नंतर ही चळवळ जगभर पसरली. तेव्हा आशिया खंडातही कालांतराने सहकार चळवळ जोर धरु लागली व १९०४ मध्ये भारतात

"*विना सहकार नाही उदधार*" या ब्रिदवाक्याखाली सहकारी चळवळ सुरु झाली म्हणजेच भारतात सहकारी चळवळीचा उगम ब्रिटीश राजवट काळात झालेला दिसून येतो. आदिम काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये सामुहिक प्रवृत्तीतस प्रोत्साहित केल्याचे दिसते. समाजवादी विचारवंत इमरसन यांच्या मते, "*मानवी विकासाच्या इतिहासात प्रतिस्पर्धात्मक संघर्षपेक्षा सहकाराला अधिक महत्व प्राप्त झाले आहे*". कारण सहकारात समाजातील सामाजिक व आर्थिक संतुलन कमी करुन एक आदर्श समाज निर्माण करण्याची शक्ती असते. एकासाठी सर्व व सर्वांसाठी एक या भावनेतून सहकारास प्रारंभ झाला. पुढे १८९२ मध्ये १९ व्या शतकात मद्रास इलाख्यातील ब्रिटीश अधिकारी सर फ्रेड्रीक निकोल्सन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भारतात जर्मनीच्या धर्तीवर कृषि सहकारी पतपुरवठा स्थापन कराव्यात अशी शिफारस भारतातील ब्रिटीश सरकारला केली याच दरम्यान उत्तरप्रदेश इलाख्यातील ब्रिटीश अधिकारी डयुपरनेक्स यांनी भारतात ग्रामिण बँका स्थापन करण्याचा सल्ला दिला या शिफारशीवर ब्रिटीश सरकारने गंभीरतापुर्वक विचार करुन १९०४ मध्ये सहकारी चळवळीला भारतात सुरुवात केली, भारतात सहकारी चळवळीची स्थापना प्रामुख्याने पतपुरवठयाच्या माध्यमातून आर्थिक विकासात वाढ होईल यासाठी करण्यात आली. त्यानंतर पुढे १९१२ मध्ये नविन सहकार कायदा करण्यात आला. या कायदयान्वये विविध प्रकारच्या सहकारी संस्था काढण्याची परवानगी देण्यात आली. १९१९ मध्ये मॉंटेग्यु जेम्स फोर्ड यांच्या प्रशासकीय सुधारणा अधिनियमानुसार सहकार हा विषय राज्य सरकारकडे सोपवण्यात आला. १९२५ ला मुंबई प्रांतात कायदा केला १९४२ मध्ये ब्रिटीश सरकारने बहुउद्येशीय सहकारी कायदा संमत करण्यात आला.

भारतातील सहकारी चळवळीचा आरंभ ख-या अर्थाने १९५१ पासून झाला, तेव्हांपासून भारत सरकारने आपल्या आर्थिक नियोजनात सहकाराला महत्वाचे स्थान दिले कारण ग्रामिण भागाचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही ग्रामिण भागाच्या विकासात सहकार हे एकमेव साधन आहे म्हणून आज भारतातील सहकारी चळवळ सर्व भागात सर्व क्षेत्रात पसरुन सहकाराचा आलेख वाढत गेला आहे. ही चळवळ महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्रप्रदेश यासारख्या राज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे साधन म्हणून पुढे आली आहे आज देशात महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा पहिला क्रमांक आहे. भारतात सहकारी चळवळीने आपल्या कार्याचा ठसा निश्चितपणे उमटवला आहे. सहकारी क्षेत्राची वाढणारी व्याप्ती, समस्या व जागतिकीकरणातील वाटचाल यात सहकारी चळवळीने आपल्या कर्तव्याकडे गांभीर्याने लक्ष देणे अपेक्षित आहे.

### जागतिकीकरणः-

जागतिकीकरण या संकल्पनेमध्ये उदारीकरण, खासगीकरण, आधुनिकीकरण या गोष्टींचा अंर्तभाव होतो. या संर्दभानुसार जागतिकीकरणामध्ये बाजार यंत्रणेचा वापर मोठया प्रमाणात करणे, सरकारी हस्तक्षेत्र व नियंत्रण कमी करणे, खासगी क्षेत्राला अधिकाधिक वाव देणे यासारख्या गोष्टींचा समावेश होतो. थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की, '*जागतिकीकरण म्हणजे सरकारी हस्तक्षेप, नियंत्रण तसेच अंर्तगत व आंतर राष्ट्रीय व्यापारावरील बंधणे कमी करुन खासगी क्षेत्राला अधिकाधिक वाव देणे म्हणजे जागतिकीकरण अथवा वैश्वीकरण होय*'.

१९९१ मध्ये भारताने नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार करुन मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रक्रियेला सुरुवात केली यामध्ये जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण व स्पर्धात्मकता इ अंमलबजावणीमुळे विविध क्षेत्रात खुली स्पर्धा सुरु झाली अर्थात याचा परिणाम सहकारी चळवळीवरही झाला. देशातील अनेक सहकारी संस्था धोक्यात आल्या आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेतील आर्थिक धोरणानुसार गट करार डंकेल प्रस्ताव, जागतिक व्यापार संघटना यांच्या विविध अटी भारतावर बंधनकारक आहेत. त्यामुळे सहकारी चळवळीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली. त्यात जागतिकीकरणाचे आव्हान निर्माण झाले.

### जागतिकीकरणात सहकारी चळवळीपुढील आव्हानेः

जागतिकीकरणानंतर सहकारी बँकाना अनेक समस्येला तोंड दयावे लागत आहे. मुक्त अर्थव्यवस्थेत जीवघेणी स्पर्धा सुरु झाली आहे व्याजाचे दर कमी होत आहेत. वाढता प्रशासकीय खर्च, वाढत्या थकबाकीचे प्रमाण, बुडीत कर्जाबाबत वाढत्या तरतुदी बँकाच्या नफ्याचे व निव्वळ घटीचे प्रमाण, अनुत्पादक कर्ज, अपुरे भांडवल, वाढता तोटा इ. समस्या भेडसावत आहेत. १९९१ च्या आर्थिक सुधारणेपासून भारतात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते वर्चस्व तसेच बाजारयंत्रणा अधिक स्पर्धात्मक बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यात उत्पादित होणा-या वस्तू स्वस्त गुणवत्तापूर्ण व वैविध्यपूर्ण आहेत. सेवा क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यानी सहकारी क्षेत्रातील संस्थेवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. देशी बाजारपेठा व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बहुराष्ट्रीय कंपन्याचे वर्चस्व आहे. बहुराष्ट्रीय व खासगी कंपन्यां स्पर्धेत सहकारी संस्था मेटाकुटीला येत आहेत. जसे की सहकारी साखर कारखान्याच्या तुलनेत खाजगी क्षत्रातील साखर कारखान्यांचा बाजारातील वाटा, उत्पादन व उत्पन्न जास्त आहे. दिवसेंदिवस खासगी क्षेत्राच्या तुलनेत सहकारी क्षेत्र मोडकळीस येताना दिसून येत आहे. एका बाजूला सहकारी संस्थाना सरकारकडून तर दुस-या बाजूने सहकारी संस्थांचे स्वतःचे उत्पन्नाचे मार्ग तुटपुंजे पडत आहेत. त्यामुळे सहकारी चळवळ अडचणीत सापडत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर सहकारी संस्थाची अकार्यक्षमता व्यवस्थापनातील उणिवा, व्यावसाईक दृष्टीकोनाचा अभाव, नेतृत्व, नैतिकतेचा अभाव, सहकारासाठी सर्वस्व झोकून देण्याची वृत्ती अशा काही मुलभुत बाबींमुळे सहकार चळवळ जागतिकीकरणाच्या रेटयात टिकून राहील का अशी शंका वाटत आहे. कारण खुल्या बाजारव्यवस्थेत स्पर्धा आहेत. ही स्पर्धा खाजगी क्षेत्राशी आहे. सार्वजनिक क्षेत्र आपल्या कार्यक्षम व्यवस्थापनातून नफाच मिळवते अन्यथा उत्पादन बंद करते मात्र अशा प्रकारची भूमिका सहकारी क्षेत्राला घेऊन चालणार नाही कारण सहकारात सर्वसमावेशकता आहे. म्हणजेच स्पर्धात्मक कमी आहे. त्यामुळे जागतिकीकरण हे सहकारी चळवळीपुढील एक आव्हानच आहे.

**उपाययोजनाः-१)**जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून राहण्यासाठी सहकारी संस्थानी रचनात्मक बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकारी संस्थाच्या कार्यात व व्यवस्थापनात सुधारणा घडून येईल. **२)** सहकारी संस्था सभासदांना उद्बोधन करुन त्यांच्यात व संस्थेत व्यावसायिकता निर्माण करणे गरजेचे आहे. **३)** सहकारी क्षेत्रासाठी तज्ञ व अनुभव असणारे व कार्यकारी मंडळ असावे. **४)** कृषिवर आधारित आयात निर्यात संस्था स्थापन कराव्यात. **५)**सहकारी संस्थानी जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी सहकारी क्षेत्रात खासगी संस्थाना सहभागी करुन घ्यावे. **६)**बहुराष्ट्रीय कंपन्यातील भांडवल व स्पर्धात्मकता आणण्यासाठी सहकारी संस्था एकसंघ कराव्यात. **७)** नविन आर्थिक धोरणात सहकारी संस्थाना खासगी क्षेत्राबरोबर स्पर्धा करण्यासाठी स्वायतत्ता व स्वातंत्र्य दयावे. **८)** सहकार चळवळीने विकासासाठी निष्क्रीय संस्थाची संख्या कमी करावी व संख्यात्मक नव्हे गुणात्मक वाढ करावी. **९)**सर्व राज्यात सहकारी चळवळीचा झालेला विषम विस्तार समप्रमाणात करावा यासाठी एक धोरण राबवावे. **१०)** सहकारी चळवळ वाढण्यासाठी शासन व रिझंर्व्ह बँक यांनी पुढाकार घ्यावा. **११)** सहकारी संस्थामध्ये कर्जवाटपाचे धोरण योग्य आणावे. **१२)**सहकारी चळवळीत अकार्यक्षम संस्था स्वबळावर उभ्या कराव्यात इ.

**सारांश :** जागतिकीकरणात सहकारी चळवळीला टिकवून ठेवण्यासाठी सहकारी क्षेत्राला पुर्नजीवनाची आवयकता आहे. सहकारी चळवळी विरुध्द आत्मचिंतन करुन सहकारी चळवळीच्या अस्तित्वासाठी दिर्घकालीन नियोजनबध्द कृती आराखडा बनविणे गरजेच आहे. तरच जागतकीकरण प्रक्रियेत सहकारी संस्था आपले अस्तित्व टिकवून ठेवतील व त्याचा विकास होईल.

**संदर्भः-**


१) डॉ. माथूर बी. एस., (२००१), ‘कोऑपरेशन इन इंडिया’, साहित्य भवन आग्रा.
२) उपाध्याय आर. बी., (१९७१), ‘सहकारिता एंव सामुदायिक विकास’, रतन प्रकाशन आग्रा.
३) सराफ मोहन व दापके प्रकाश, (१९९७), ‘सहकार’, विदया प्रकाशन नागपूर.
४) कुलकर्णी प्र. रा., (१९९९), सहकाराची मुलतत्वे, विदया बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
५) डॉ. कामत गो. स, (१९९७), ‘सहकार तत्व व्यवहार आणि व्यवस्थापन’, विदया प्रकाशन पुणे.
६) मधू नेने, (२०००), ‘सहकारी संकल्पना’, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे.
७) *Hough E.S., (1960), ‘Co-operative Movement in India, Oxford Uni Press Bombay.*
८) *Bedi R.D.,(1958), ‘Theory History and Practions of Co-operashan’, International Publication House meerat.*
९) www.ikipedia.orgwiki/cooperative.com